Postal Regd. No. : Tech/47-1514/MBI/2003-2005

पोलीस आणि जनतेचे व्यासपीठ

साप्ताहिक

# सत्य वार्ता

वर्ष : ३ अंक : ५१ RNI No. : MAHMAR/2001/8697 दि. : १७ ते २३ सप्टें., ०४ किंमत ३ रु.






**प्रतिनिधी :** रविवार दि. २२.०९.२००४ रोजी डोंबिवली येथे ज्योतिर्विद तसेच पायरावास्तू तज्ञ तुषार यशवंत सावडावकर संचालित कृष्णमूर्ती ज्योतिष विद्यालय व पायरावास्तू रिसर्च फाऊंडेशन या संस्थेच्या विद्यमाने, ठाणे आणि परेल येथील ज्योतिष व वास्तूशास्त्र या अभ्यास वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच पदवी दान समारंभ अतिशय उत्साहपूर्वक वातावरणात जेष्ठ कवी माननीय मंगेश पाडगावकर आणि वेदमूर्ती माननीय प्रदीप जोशी यांच्या उपस्थितीत, सौ. हेमांगिनी तुषार सावडावकर यांच्या ओघवत्या आणि रसाळ अशा सूत्र संचालनात संपन्न झाला.

वरील समारंभात ज्योतिष शास्त्रातील पहिले पारितोषिक सौ. निलिमा पंडित. ठाणे यांना मिळाले.

माननीय मंगेश पाडगावकर आणि प्रदीप जोशी यांनी तुषार गुरुजींच्या त्याग पूर्वक ज्ञानदानाची प्रशंसा करुन नवज्योतिषी आणि वास्तूतज्ञांना शुभेच्छा व्यक्त करुन त्यांना आशिर्वाद दिला. वरील समारंभास सहाय्यक पोलिस निरिक्षक कैलास चव्हाण आणि मिलिंद इडेकर तसेच अन्य मान्यवरांनी उपस्थित राहून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.